# मेट्रो-३ मार्ग डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण
# मुख्यमंत्री शिंदे यांची पाहणीनंतर ग्वाही

■ मुंबई

मेट्रो-३ हा मार्ग जवळपास ९० टक्के पूर्ण झाला असून, डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत मेट्रो रेल्वेचा हा टप्पा पूर्ण होईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मंगळवारी रात्री उशिरा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई मेट्रो-३ टप्प्याच्या चर्चगेट ते विधान भवन या भुयारी मार्गाची पाहणी केली. यावेळी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे संचालक (प्रकल्प) सुबोध गुप्ता यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुंबई मेट्रो मार्ग-३ (कुलाबा-वांद्रे-सिप्झ) हा मुंबईसाठी प्रस्तावित असलेला पहिला आणि एकमेव पूर्णपणे भूमिगत मेट्रो मार्ग आहे. शहरात वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी तसेच वाहतुकीच्या पर्यायी सुविधेसाठी हा मार्ग असून, त्याचे काम प्रगतिपथावर आहे. यामुळे वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. मेट्रोमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे. अतिशय अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हवा, ध्वनी प्रदूषण होणार नाही, याची काळजी घेण्यात आली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



**कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ : एक दृष्टिक्षेप**

- **लांबी -** ३३.५ कि.मी. भुयारी
- **स्थानके -** २७ (२६ भुयारी तर एक जमिनीवरील)
- **गाड्या -** २०२४ पर्यंत ८ डब्यांच्या ३१ गाड्या